## आतील पानात वाचा
- सबसे बडा खिलाडी सुरेश कलमाडी...
- कोकणात आढळले हिरवे कासव...
- पाटण तालुक्यातील तब्बल ६१ पाणंद रस्ते खुले १० हजार शेतकऱ्यांना होणार फायदा...

दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com



खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here



वर्ष : ०५ | अंक : १४५, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, बुधवार, दि.०७ जानेवारी २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# बीडमध्ये दिवसाढवळ्या थरार; तरुणाची गोळ्या झाडून निर्घृण हत्या

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०६, बीड :** गेल्या काही दिवसांपासून शांत असलेल्या बीड शहरात आज दुपारी पुन्हा एकदा रक्ताचा सडा पडला. शहरातील अंकुश नगर भागात एका ३८ वर्षीय तरुणाची अज्ञात हल्लेखोरांनी अत्यंत निर्घृणपणे हत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेमुळे संपूर्ण शहरात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हर्षद शिंदे (वय ३८, रा. धानोरा रोड, हाउसिंग कॉलनी, बीड) हा तरुण बीड नगरपालिकेत प्लंबिंगचे काम करत होता. आज दुपारी २ वाजण्याच्या सुमारास तो अंकुश नगर येथील शिवाजीनगर रोडवर आपल्या कामात व्यस्त होता. यावेळी दबा धरून बसलेल्या अज्ञात हल्लेखोरांनी त्याच्यावर अचानक हल्ला चढवला.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, हल्लेखोरांनी सुरुवातीला हर्षदवर दोन गोळ्या झाडल्या. गोळीबाराच्या आवाजाने परिसरात एकच धावपळ उडाली. जखमी अवस्थेत स्वतःचा जीव वाचवण्यासाठी हर्षद जवळच असलेल्या एका पत्र्याच्या शेडच्या मागे धावत गेला. मात्र, हल्लेखोराने त्याचा पाठलाग सोडला नाही. त्या ठिकाणी त्याला गाठून हल्लेखोराने धारदार शस्त्राने त्याच्यावर सपासप वार केले. या भीषण हल्ल्यात हर्षद जागीच रक्ताच्या थारोळ्यात पडला



आणि त्याचा मृत्यू झाला.

**पोलीस प्रशासनाची धाव...**

घटनेची माहिती मिळताच शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल झाले. घटनेचे गांभीर्य ओळखून बीडचे अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, पोलीस उपाधीक्षक पूजा पवार, आणि पोलीस निरीक्षक बांगर यांनी तातडीने घटनास्थळाची पाहणी केली. खबरदारीचा उपाय म्हणून परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

**तपासासाठी फॉरेन्सिक टीम पाचारण...**

हत्येचा हा प्रकार अत्यंत नियोजित वाटत असल्याने पुराव्यांची जुळवाजुळव करण्यासाठी फॉरेन्सिक पथकाला पाचारण करण्यात आले होते. फॉरेन्सिक टीमने घटनास्थळावरून रक्ताचे नमुने, गोळ्यांच्या पुंगळ्या आणि इतर तांत्रिक पुरावे गोळा केले आहेत.

**हत्येचे कारण अस्पष्ट...**

हर्षद शिंदे याची हत्या कोणी केली आणि त्यामागे नेमका काय उद्देश होता, हे अद्याप स्पष्ट होऊ शकलेले नाही. जुन्या वादातून ही हत्या झाली की यामागे काही वेगळे आर्थिक किंवा वैयक्तिक कारण आहे, याचा तपास पोलीस करत आहेत. दिवसाढवळ्या वर्दळीच्या ठिकाणी अशा प्रकारे गोळीबार आणि हत्या झाल्याने बीडमधील कायदा व सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. सध्या शिवाजीनगर पोलीस संशयितांचा शोध घेत असून, परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्याचे काम सुरू आहे. या घटनेमुळे मृताच्या कुटुंबावर शोककळा पसरली असून परिसरात तणावपूर्ण शांतता आहे.

## किन्हवली-दहिवली हद्दीत नदीकिनारी मृत अर्भक आढळून आल्याने खळबळ



**अक्षराज : सुनिल फर्डे**

**दि.०६, शहापूर (ठाणे) :** किन्हवली – दहीवली गावाच्या हद्दीत नदीकिनारी एक मृत अर्भक आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली. याबाबतची माहिती मिळताच किन्हवली पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन खैरनार व उपनिरीक्षक रामेश्वर तळेकर यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. अभिजित वानखडे यांनाही बोलावण्यात आले होते. घटनास्थळी तपासणी केली असता सदर अर्भक हा पुरुष जातीचा असून सुमारे तीन ते चार दिवसांचे असल्याचे निष्पन्न झाले आहे.

मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होण्यासाठी जागेवरच पोस्टमार्टेम करण्यात आले. त्यानंतर नियमाप्रमाणे सदर अर्भकावर अंत्यविधी करण्यात आला. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.या प्रकरणाचा पुढील तपास किन्हवली पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक रामेश्वर तळेकर हे करीत आहेत.

## 'इम्पॅक्ट दै.अक्षराज' च्या बातमीचा...
## विंचूर आरोग्य केंद्राला मिळाले कायम स्वरुपी डॉक्टर

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०६, विंचूर (नाशिक) :** दै.अक्षराज च्या बातम्यांचा इम्पॅक्ट; वेळोवेळी पाठपुरावा करत बातमी लावत आज या विंचूर आरोग्य केंद्रात कायम स्वरुपी डॉक्टर लाभले आहे.



विंचूर येथील आयुर्वेदिक आरोग्य केंद्रात, प्राथमिक आरोग्य केंद्र निमगाव वाकडा यांच्या वतीने सोमवार, दि.५ जानेवारी २०२६ रोजी 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' अभियानांतर्गत विशेष आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात गरोदर माता आणि आदी रुग्णांची आरोग्य तपासणी करण्यात आली असून, ग्रामस्थांनी या उपक्रमाला मोठा प्रतिसाद दिला.

केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्रालयाच्या 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' या अभियानाच्या माध्यमातून स्त्रियांच्या आरोग्याला एक नवा आयाम देण्याचा प्रयत्न केला जात आहे. याच उद्देशाने जिल्हा वैद्यकीय अधिकारी आणि तालुका वैद्यकीय अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली विंचूर येथे हे शिबिर पार पडले.

या शिबिरामध्ये स्त्रीरोग, बालरोग, रक्तदाब तपासणी, वजन आणि रक्ताच्या विविध चाचण्या मोफत करण्यात आल्या. शिबिरात गरोदर महिलांची विशेष काळजी घेण्यात आली, तसेच वृद्ध नागरिक, किशोरवयीन मुले-मुली आणि बालके अशा एकूण ३४ लाभार्थींना मोफत आरोग्य सेवेचा लाभ मिळाला. केवळ तपासणीच नव्हे, तर यावेळी उपस्थित डॉक्टरांनी उपस्थितांना आरोग्य शिक्षण देऊन सुदृढ आरोग्यासाठी मार्गदर्शनही केले.

तसेच विंचूर येथील ग्रामपालिकेचे विद्यमान सरपंच सचिन दरेकर यांनी या बातमीचा वृत्तांत बघताच तातडीने फोन करून शाळेला दोन दिवसात कंपाऊंड बसविले. त्यामुळे शाळेतील विद्यार्थी शिक्षक आणि ग्रामस्थांमध्ये सरपंच व विंचूर ग्रामपालिकेबद्दल मोठा आदर निर्माण झाला आहे. आणि आणि सरपंच दरेकर यांनी दैनिक अक्षराच्या ब्रिद वाक्या प्रमाणेच आहे की, 'अचूक वेध अचूक बातमी' बद्दल विशेष आभार व्यक्त केले.

# पारनेर तहसीलदारांना निलंबित करा!
## टाकळी ढोकेश्वर रस्ता रोको आंदोलनात झावरे पाटीलांचा संतप्त इशारा

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०६, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील मांडओहळ परिसरातून सुरू असलेल्या अवैध वाळू उत्खनन आणि वाहतुकीमुळे पुन्हा एकदा निष्पाप तरुणाचा जीव गेला आहे. रविवारी (४ जानेवारी २०२६) सकाळी सुमारे ७ वाजता मांडओहळ नदीपात्रातून अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या भरधाव डंपरने बोकनकवाडी ते वासुंदे रोडवर दुचाकीस्वाराला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात संतोष नऱ्हे (वय ३२, रा. बोकनकवाडी, ता. पारनेर) यांचा जागीच मृत्यू झाला. अपघात इतका भीषण होता की, दुचाकीचा पूर्णपणे चक्काचूर झाला आणि परिसरात हळहळ व्यक्त झाली.

या घटनेने संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी, युवकांनी आणि कार्यकर्त्यांनी तात्काळ प्रतिक्रिया देत मंगळवार (दि. ६ )जानेवारी रोजी सकाळी १० वाजल्यापासून टाकळी ढोकेश्वर येथील महात्मा फुले चौकात मुख्य रस्त्यावर रस्ता रोको आंदोलन छेडले. शिवसेना नेते तथा जिल्हापरिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. आंदोलन नगर कल्याण महामार्गावर सलग तीन तास सुरू होते. आंदोलकांनी थेट पारनेर तहसीलदारांच्या निलंबनाची मागणी करत प्रशासनाच्या हलगर्जीपणावर जोरदार टीका केली.

मांडओहळ परिसरात गेल्या काही वर्षांपासून अवैध वाळू उत्खनन आणि भरधाव डंपरांची बेधडक वाहतूक सुरू आहे. यामुळे वारंवार अपघात घडत असूनही महसूल आणि पोलीस प्रशासनाकडून प्रभावी कारवाई होत नसल्याचा आरोप आंदोलकांनी केला. या अवैध धंद्यात वाळू माफियांचा समावेश असून त्यांना प्रशासकीय पाठबळ मिळत असल्याची भावना परिसरात आहे. संतोष नऱ्हे यांचा मृत्यू हा अपघात नसून प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे घडलेला खून असल्याचे आंदोलकांचे म्हणणे आहे. आंदोलनादरम्यान आंदोलकांनी अनेक मागण्या जोरदारपणे मांडल्या. मांडओहळ परिसरातील

### सुजित झावरे पाटील यांची तहसीलदारांवर आगपाखड...



अवैध वाळू उत्खनन तात्काळ बंद करावे, वाळू माफियांवर कठोर गुन्हे दाखल करावेत, अपघातातील डंपर चालक आणि मालकावर हत्येचा गुन्हा दाखल करावा, तसेच महसूल आणि पोलीस विभागाने समन्वय साधून दोषींना कठोर शिक्षा करावी, अशी प्रमुख मागणी करण्यात आली. याशिवाय पारनेर तहसीलदारांच्या कार्यपद्धतीवरही आंदोलकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. ज्येष्ठ नागरिकांनी तहसील कार्यालयात जाताना होणाऱ्या अपमानास्पद वागणुकीबाबत आणि अरेरावी भाषेच्या वापराबाबत तक्रारी मांडल्या. तहसीलदार जनतेवर माज दाखवत असल्याचा आरोप करत त्यांचे तात्काळ निलंबन करण्यात यावे, अशी ठाम मागणी आंदोलकांनी केली.

रस्ता रोको आंदोलनामुळे नगर कल्याण महामार्ग व पारनेर ते साकुर मुख्य रस्त्यावरील वाहतूक काही काळ पूर्णपणे ठप्प झाली. अनेक वाहने रांगेत उभी राहिली. मात्र आंदोलकांनी शांततापूर्ण पद्धतीने आंदोलन केले. त्यांनी प्रशासनाला निवेदन सादर करत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे मागण्या पाठवण्याची विनंती केली. पोलीस आणि महसूल अधिकार्यांनी आंदोलकांशी चर्चा करून वरिष्ठांकडे मागण्या पाठवण्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन तात्पुरते मागे घेण्यात आले.

आंदोलकांनी प्रशासनाला स्पष्ट इशारा दिला की, अवैध वाळू वाहतुकीमुळे आणखी दुर्दैवी घटना घडल्यास संपूर्ण जबाबदारी प्रशासनाची राहील आणि यापेक्षाही तीव्र आंदोलन छेडले जाईल. परिसरातील नागरिकांनी एकजूट दाखवत अवैध वाळू धंद्याला आळा घालण्यासाठी प्रशासनाने ठोस पावले उचलावीत, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

यावेळी सुजित झावरे पाटील यांच्यासह जेष्ठ नेते कारभारी आहेर, शिवसेना नेते संदीप कपाळे, उद्योजक संदीप रोहकले, उपसरपंच माऊली वरखडे, मारुती रोहकले, सरपंच विमल झावरे, सरपंच प्रकाश गाजरे, शंकर बर्वे, संतोष शेलार, भगवान वाळुंज, भाऊ सैद, दिलीप पाटोळे, पो. मा. झावरे, बाळासाहेब झावरे, शरद पाटील, महादू भालेकर, सूर्यभान भालेकर, विठ्ठल झावरे, बापूसाहेब गायखे, संतोष ढोकळे, चेअरमन शिवाजी रोकडे, सचिन सैद, संजय भोर, पप्पू कासुटे, इंजि प्रसाद झावरे, इंजि. निकील झावरे, स्वप्नील झावरे, गणेश शिरतार, मनोज झावरे, अशोक भालेकर, संतोष भालेकर, अभिनव पाटोळे, संग्राम झावरे, अशोक पाटोळे, संतोष दाते, कैलास भालेकर, साहेबराव गुंजाळ, लक्ष्मण झावरे,नारायण झावरे, किरण पोपळघट, कुलदीप शिरतार, महेश झावरे, पांडुरंग आहेर, भास्कर शिंदे, संकेत झावरे, दत्तात्रय जगदाळे, आदी यावेळी उपस्थित होते.

> "पारनेर तहसीलदार जनतेचे सेवक असले पाहिजेत, मात्र ते माज दाखवत आहेत. वयोवृद्ध नागरिकांशी अरेरावी करणे आणि अपमानास्पद वागणूक देणे लोकशाहीत खपवून घेतले जाणार नाही. अशा अधिकाऱ्यांचे तात्काळ निलंबन झाले पाहिजे, अन्यथा आम्ही यापेक्षाही तीव्र आंदोलन छेडू.
>
> **- सुजित झावरे पाटील**
> **(माजी उपाध्यक्ष जिल्हा परिषद)**
>
> "टाकळी ढोकेश्वर येथील रस्ता रोको ही फक्त सुरुवात आहे. जनतेला न्याय मिळेपर्यंत लढा सुरू राहील. अवैध वाळू धंदा बंद करा, दोषींना शिक्षा करा आणि तहसीलदारांची अरेरावी थांबवा. प्रशासनाने जनतेच्या भावना समजून घेऊन ठोस पावले उचलली नाहीत तर मोठे आंदोलन अटळ आहे.
>
> "मांडओहळ परिसरात अवैध वाळू उत्खनन आणि भरधाव डंपरांची बेधडक वाहतूक नागरिकांच्या जीवावर उठली आहे. नियमबाह्य उत्खननामुळे निष्पाप लोकांचे बळी जात आहेत. हे अपघात नव्हेत, तर सरळ खून आहेत. याला जबाबदार गुन्हेगार आणि अधिकारी मोकाट फिरत आहेत. प्रशासनाने तात्काळ कारवाई करावी.

# सबसे बडा खिलाडी सुरेश कलमाडी

सुरेश कलमाडी या नावाशिवाय पुण्याचा राजकीय इतिहास पूर्णच होऊ शकत नाही. जवळपास तीन दशके पुण्याच्या राजकारणावर एकहाती हुकूमत गाजवणारे पुण्याचे कारभारी असलेले पुण्याचे माजी खासदार सुरेश कलमाडी यांचे मंगळवार ६ जानेवारी रोजी वयाच्या ८२ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने पुण्यावर एकहाती वर्चस्व गाजवणारा नेता काळाचा पडद्याआड गेला. १ मे १९४४ रोजी जन्मलेले सुरेश कलमाडी यांनी सेंट व्हिन्सेंट हायस्कुलमधून आपले शालेय शिक्षण पूर्ण केले तर पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमधून उच्च शिक्षण पूर्ण केले. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी पुण्याच्या नॅशनल डिफेन्स अकॅडमीमध्ये प्रवेश घेऊन पायलट बनण्याचे प्रशिक्षण घेतले. प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी काही वर्ष भारतीय हवाई दलात पायलट म्हणून सेवा केली. १९६५ आणि १९७१ च्या युद्धात त्यांनी हवाई दलाचे पायलट म्हणून भाग घेतला होता. १९७२ साली त्यांनी राजकारणात प्रवेश केला. संजय गांधी यांचे ते निकटवर्ती होते त्यांच्यामुळेच ते राजकारणात आले असे म्हंटले गेले. काँग्रेस पक्षात प्रवेश केल्यावर त्यांना पुण्याचे प्रमुख बनवण्यात आले. त्या काळी पुण्यात अनेक दिग्गज नेते होते मात्र सर्वांना बाजूला सारून त्यांनी पुण्याची धुरा स्वीकारली. ९० च्या दशकात तर पुण्यावर त्यांचे एकहाती वर्चस्व होते. १९९१ साली तत्कालीन पंतप्रधान पी व्ही नरसिंहराव यांनी त्यांना आपल्या मंत्रिमंडळात घेतले आणि रेल्वे राज्यमंत्रीपदाची जबाबदारी त्यांच्यावर सोपवली. रेल्वे राज्यमंत्री म्हणून त्यांनी रेल्वेचा अर्थसंकल्पही सादर केला होता. केंद्रीय मंत्री आणि पंतप्रधान नरसिंहराव यांचे निकटवर्ती असल्याने पुण्यावर त्यांनी एकहाती वर्चस्व गाजवायला सुरुवात केली. पुण्यात ते काँग्रेसचे सर्वेसर्वा बनले. पुणे महानगर पालिकेवर त्यांचे एकहाती वर्चस्व होते. पुण्याचे नगरसेवक, पुण्याचा महापौर कोण होणार हे कलम ाडी ठरवत असे. पुण्याचे आमदार देखील कलम ाडींच्याच मर्जीतील असत. पुण्याच्या राजकारणावर त्यांची एकहाती पकड होती म्हणूनच त्यांना पुण्याचे



कारभारी असे संबोधले जायचे. त्यांच्याभोवती कार्यकर्त्यांची रीघ लागलेली असे. त्यांचे कलमाडी हाऊस कार्यकर्त्यांनी फुलून गेलेले असे. केंद्रीय मंत्री आणि पुण्याचा खासदार या नात्याने त्यांनी पुण्याला जागतिक शहर बनवण्याचा प्रयत्न केला. पुणे मेट्रो प्रकल्प, विमानतळ विकास त्यांच्याच प्रयत्नामुळे साकार झाले. पुण्यात सर्वप्रकारच्या पायाभूत सुविधा असाव्यात असा त्यांचा आग्रह असे. पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन आणि पुणे फेस्टिवल सुरू करून त्यांनी पुण्याला जागतिक स्तरावर नेले. १९९१ ते १९९६ या काळात पुणे काँग्रेसचे सर्वे सर्वा असणाऱ्या कलमाडी यांनी १९९७ साली मात्र काँग्रेस सोडली. १९९८ साली झालेल्या लोकसभा निवडणुकीत त्यांचा पराभव झाला. पराभवानंतर कलमाडी यांनी शरद पवारांमुळेच आपल्याला पराभव स्वीकारावा लागला असे त्यावेळी जाहीर वक्तव्य केले होते. अपक्ष म्हणून निवडणुकीत उभे राहिलेल्या कलमाडी यांना भाजपने पाठिंबा दिला होता आणि त्यांच्या प्रचारासाठी तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी पुण्यात आले होते. १९९८ साली झालेली राज्यसभा निवडणूक खूप गाजली या निवडणुकीत ते पुन्हा अपक्ष म्हणून उभे राहिले. या निवडणुकीत त्यांचे प्रतिस्पर्धा होते राम कदम. राम कदम हे गांधी कुटुंबाच्या जवळचे होते शिवाय जिंकून येण्याइतपत मते त्यांच्याकडे होते तरीही त्यांना धोबीपछाड देऊन कलमाडी यांनी ती निवडणूक जिंकली आणि राजकारणात भूकंप घडवला होता. या विजयानंतर त्यांच्या कार्यकर्त्यांनी सबसे बडा खिलाडी सुरेश कलमाडी अशा घोषणा दिल्य होत्या. १९९९ साली काँग्रेस फुटली शरद पवारांनी राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केली सुरेश कलमाडी पुन्हा काँग्रेसमध्ये परतले. २०१० पासून मात्र त्यांच्या राजकीय कारकीर्दीला उतरती कळा लागली. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत गैरव्यवहार केल्याचा त्यांच्यावर आरोप करण्यात आला. त्यांना काहीकाळ तुरुंगातही रहावे लागले. २०२५ साली ईडी ने त्यांच्या विरोधात पुरावे नसल्याने क्लोजर रिपोर्ट दाखल केला न्यायालयानेही तो स्वीकारला पण तोपर्यंत खूप उशीर झाला होता. सुरेश कलमाडी हे राजकीय विजनवासात पोहचले होते. जवळपास तीन दशके पुण्याचे कारभारी राहिलेले सबसे बडे खिलाडी सुरेश कलमाडी यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# गिग कामगारांचा एल्गार!

दहा मिनिटांत घरपोच पोहोचणार'.'सर्वात वेगवान सेवा, वाटेल तेव्हा, वाटेल तिथे '.अशा जाहिराती वाचून आपण ऑर्डर केलेली वस्तू आपल्यापर्यंत पोचण्यासाठी निघाल्याचा संदेश येतो. वस्तू कोणाच्यातरी पाठीवरून मोटारसायकलवरून बॅगमधून प्रवास करत असते. बॅगचा आकार पाठीपेक्षा किमान दोनपट मोठा असतो. संध्याकाळाची वेळ असते. कधी प्रचंड पाऊस असतो. कधी भाजून काढणारे उन असते. रस्त्यावर कोंडी असते. वेळेत पोचण्यासाठी काहीही करून वाहतुकीतून १० मिनिटांत पोहोचण्यासाठी तो जीव धोक्यात घालून गाडी चालवत राहतो. कधी सिग्नल तोडतो. इतका ताण सतत दिवसभर बाळगणारा हाच तरुण आपल्या घराची बेल वाजवतो. हातात पार्सल देऊन जातो.आणि इतके सर्व करून हा बिनचेहऱ्याचा माणूस पाच स्टार देण्याची याचना करतो. किंवा पाच मिनिटांच्या उशिरासाठी तुमच्या शिव्या खातो. धमक्यांचा सामना करतो. हा आहे गिग वर्कर. आठवड्याचे सात दिवस २४ तास या नव्या ऑनलाइन व्यापाराचे ओझे पाठीवर राबविणारा बिनचेहऱ्याचा भारवाहक.

यांची ही असह्य कोंडी गेली काही वर्षे सुरू आहे. त्याला वाचा फोडण्यासाठी त्यांनी युनियन करून सरकार आणि व्यवस्थापनासमोर काही मागण्या मांडल्या. त्या म्हणजे,'१० मिनिटांत पोहोच', ही पद्धती बंद करा, आम्हाला मिळणारा बोनस आणि मोबदला ठरविणाऱ्या संगणकीय प्रक्रिया खुल्या आणि पारदर्शी करा.आमच्या समस्या समजून घेण्यासाठी संवादाची माध्यमे निर्माण करा. आम्हाला किमान सुरक्षा आणि अपघात विमा द्या, किमान वेतन दरमहा मिळण्याची हमी द्या इत्यादी. त्याव उपाय करण्याऐवेजी त्यांना या कंपन्यांच्या मालकांनी पाळलेल्या गुंडांकडून धमक्या मिळू लागल्या. शेवटी त्यांनी ३१ डिसेंबर रोजी संप केला.

**●कामगार कायद्याखाली ओळखच नाही.**

कामगार कायद्यानुसार गिग वर्कर कोणाचाच 'कामगार' समजला जात नाही. त्याचा कोणी नियोक्ता नाही. कोणीही केव्हाही कामावर ठेवावे-काढावे-कितीही मोबदला द्यावा. वेतनाची-सेवेची-सामाजिक सुरक्षेची कसलीच शाश्वती नाही. दाद नाही-फिर्याद नाही. २१व्या शतकातील बाजारव्यवस्थेचा कणा हा सर्वात असुरक्षित,असंघटित आहे. गिग वर्करच्या व्याख्येत झोमॅटो, टोमॅटो, अमॅझॉन, फ्लिपकार्ट ब्लिंकिट, स्विगी, ओला-उबर-रॅपिडो-अर्बनक्लॅप, अशा शेकड्यांनी ऑनलाइन प्लॅटफॉर्म, मोबाइल ॲप्स किंवा इतर कोणत्याही प्रकारे काम करणाऱ्या ॲप-आधारित कामगारांचा समावेश होतो. अशा भारत सरकारच्या अंदाजानुसार प्लॅटफॉर्म/गिग कामगारांची सध्याची संख्या १ कोटी २७ लाख असल्याचा अंदाज आहे आणि पुढील ७ वर्षांत ती २.३ कोटींपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. १५ वर्षानंतर भारतात ३०% गिग इकॉनॉमीमध्ये असू शकतात,असाअंदाज आहे.

**●अपारदर्शक व्यवहार आणि फसवणूक**

त्यातील काही ॲपसाठी मोठ्या रक्कमा भरून ॲपवर नोंदणी करावी लागते. त्यांना देय होणाऱ्या वेतन, उत्तेजना बोनस किंवा श्रमसेवेबद्दलच्या मोबदल्यासाठीच्या अटी अत्यंत अपारदर्शक असतात. त्याचे संगणकीय कोड सार्वजनिक करावेत, ही मागणी या ॲपमालकांनी फेटाळून लावली आहे. या गुप्त ठेवलेल्या पद्धतींचा वापर करून गिग कामगारांची फसवणूक किंवा दिशाभूल केली जाते. सेवा-शर्ती-मोबदल्याचे दर एकतर्फी बदलले जातात. कमीत कमी वेळात अधिकाधिक काम केल्यास अधिक दराने मोबदला देण्याचे अमिष दाखविले जाते. प्रत्यक्षात कामगार त्या पातळीपर्यंत पोचतो आहे असे दिसताच, त्याला काम देणेच बंद किंवा कमी केले जाते. सेवेतून कधीही मुक्त केले जाऊ शकते. १२ तास सेवेमध्ये असणाऱ्यांच्या आयुष्याचा विमा नाही. अगदी सेवेत असण्याच्या वेळात जरी अपघात झाला, मृत्यू किंवा कायमचे अपंगत्व आले, तरी कोणतीही विमा-सुरक्षा किंवा नुकसानभरपाई उपलब्ध नाही.

**●अदृश्य व्यवस्थापन**

नियोक्ता कंपनीच्या ज्या अधिकाऱ्यांशी या कामगारांचा संबंध येतो त्यांनीदेखील वरिष्ठ व्यवस्थापनाचा चेहराही पाहिलेला नसतो. वाट्टेल त्या मार्गांचा अवलंब करून विनितक्रार काम करवून घेणे, अशी साधारणतः गुंडांच्या टोळीच्या व्यवहार पद्धतीवर आणि मानसिकतेवर या ॲप्सचे कामगार-व्यवस्थापक संबंध असतात. त्यांच्याशी चर्चा-संवाद हा प्रश्नच उद्भवत नाही. त्यातूनही जे कोणी प्रश्न विचारतील किंवा तक्रार करतील, संघटित कृतीमध्ये सहभागी होतील, त्यांना काढून टाकणे हे ते सतत करतात.

# 'लाईक, शेअर आणि कमेंट'

आजचे युग हे 'लाईक, शेअर आणि कमेंट'चे आहे. फेसबुक, व्हाट्सअप, इंस्टाग्राम अशा सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर आजची तरुण, प्रौढ आणि थोडीफार वयस्क मंडळी दिवसातील किम ान एक तास तरी घालवत आहेत. आवडलेल्या पोस्टला, व्हिडिओला किंवा रिलला लाईक करणे, शेअर करणे अथवा कमेंट करणे हे नित्याचे झाले आहे. अभिव्यक्तीचा हा बदलता फॉर्म आता सर्वांच्या अंगवळणी पडू लागला आहे.

मनापासून आवडलेली पोस्ट असेल तर लाईक करणे सहज होते; मात्र न आवडलेल्या गोष्टीलाही लाईक करून पोस्ट टाकणाऱ्याची मर्जी राखावी लागते. पूर्वी पारावर बसून लोक समोरासमोर गप्पा मारायचे. मनातील विचार मोकळेपणाने मांडायचे, एखादी कथा किंवा कल्पना सर्वांना सांगायचे, घडलेला प्रसंग कथन करायचे. आपले मत म नापासून व्यक्त करून समोरच्या सगळ्यांवर प्रभाव टाकायचे. बोलण्यातून आणि हावभावांतून त्या व्यक्तीचा खरेपणा समजायचा.आज मात्र सगळे काही नाटकी झाले आहे. तीस सेकंदांची स्वतःची रील बनवून अनेक जण लोकांना सहज वेड्यात काढतात. तंत्रज्ञानाचा वापर करून, रिटेक घेऊन तयार केलेला व्हिडिओ पाहणाऱ्याचे मन सहज बदलवू शकतो.

प्रत्यक्ष भेटींपासून खलिता, घोडेस्वार, कबूतर, पत्र, फोन, मोबाईल, व्हाट्सअप , फ ेसबुक, इंस्टाग्राम अशी साधने वापरत माणूस वेगाने बदलत चालला आहे.आता लोक एकमेकांशी ऑनलाईन भांडतात. फेसबुक व इंस्टाग्रामवर एकमेकांच्या कुळाचा उद्धार करतात. अंगावरची कपडे काढून, डोक्याला गुंडाळून लोक एकमेकांवर जहरी कमेंट्स करतात. व्हाट्सअप वर झालेली भांडणे प्रत्यक्ष मैदानात उतरतात आणि दंगली भडकतात. एखाद्या पोस्टवर टाकलेल्या कमेंटवर पुन्हा कमेंट्स येतात आणि त्यातून एकम ेकांना ' पाहून घेऊ' अशी भाषा वापरली जाते. जात, धर्म, वंश, भाषा, राजकीय विचारसरणी या सगळ्या विषयांवर लोक तावातावाने, अतार्किक पद्धतीने व्यक्त होतात. एखाद्याचे मनोबल खच्ची करण्याचा सोपा मार्ग म्हणजे त्याच्या सोशल मीडियाच्या वॉलवर नको त्या शब्दांत कमेंट करणेहे आजचे प्रभावी अस्त्र बनले आहे. मॉर्फ करून तयार केलेले व्हिडिओ समाजात अशांतता निर्माण करू शकतात. एआयचा वापर करून बनवलेले व्हिडिओ एखाद्याला आयुष्यातूनच उठवू शकतात.

लाईक, कमेंट आणि शेअर यांच्या म ाध्यमातून समाजात आनंद, प्रेम, शांतता आणि भाईचारा पसरवायचा की अशांतताहे आता सम ाजाच्या हातात आहे.

१९९० च्या दशकात जन्माला आलेल्या अनेकांच्या डोळ्यांसमोर जन्मानंतर लगेचच कॉम्प्युटरचा स्क्रीन आणि इंटरनेट आले. ही पिढी आज २५ ते ३० वर्षांची असून करिअर आणि सोशल मीडियात गुंतलेली आहे. त्यांच्या पाठोपाठ आलेली १५ ते २५ वयोगटातील तरुण पिढी ज्या अनुभवांतून जगते, त्यांचा गंधही ४५ ते ७० वयोगटातील जुन्या पिढीला नाही. त्यामुळे या 'जेन झी' पिढीला समजून घेणे आणि त्यांच्या अभिव्यक्तीच्या नव्या ट्रेंडला योग्य दिशा देणे, हेच वयस्कर पिढीसमोरील खरे आव्हान आहे.

शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते की, तंत्रज्ञान थांबणार नाही; बदलही थांबणार नाही. मात्र 'लाईक, शेअर आणि कमेंट' या छोट्याशा कृतींम ागे असलेली जबाबदारी प्रत्येकाने ओळखली, तर हाच सोशल मीडिया समाजजोडीचा मजबूत पूल ठरू शकतो.

**- किशोर जाधव, सोलापूर**
**- मो. नं. ९९२२८८२५४१**

# पडघम

एक मागून दुस–या
निवडणूका पडघम
यंत्रणेवरचा असह्य
ताणवाढवे एकदम

कर्मचारी कमालीचे
सतत रहावे स क्षम
उसंत नाही जराशी
तरीहीहवे कार्यक्षम

पगार न् जबाबदारी
प्रमाणअगदी विषम
चूकअसो बारीकशी
गुन्हाबनतोयं अक्षम

सारखेबंधनात बध्द
पाळा कायदे नियम
प्रमाण न घडोकाही
तलवार डोई कायम

प्रत्येकाच्या नजरांत
संशय आणि संभ्रम
मोज रे मोठी किंमत
लहानजरी रे विभ्रम

निकाललागेतो चाले
कारावास हा स श्रम
सुट्ट्या सगळ्या रद्द
वाट्याला ये परिश्रम

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# मौजे बागमांडला समुद्र किनाऱ्यांवर पहिल्यांदाच आढळले ग्रीनसीटर्टल कासव

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०६, रायगड :** मौजे बागमांडला, श्रीवर्धन येथे फेरीबोटीच्या नवीन जेट्टीच्या एका बाजूला चिखलांवर एक मोठं कासव वाहून आले आहे असा तिथे काम करणाऱ्या आकाश सुरेश पाडलेकर रा.वेळास यांनी वनविभाग कांदळवन कक्ष दक्षिण कोकण यांचे कार्यालयास संपर्क केला असता कांदळवन विभाग दक्षिण कोकण यांचे अधिनस्त वनरक्षक, कासव तज्ञ, कासव मित्र यांनी घटनास्थळी प्रत्यक्षदर्शी जाऊन पाहिले असता ते ग्रीन सी टर्टल या प्रजातीचे नरकासव आहे.

रायगड जिल्हयात सागरी क्षेत्रात सागरी कासवांच्या पाच प्रजाती आढळतात त्या अनुषंगाने या प्रजातीचा त्यात समावेश आहे. परंतु आज मौजे बागमांडला, श्रीवर्धन येथे प्रथमच नर ग्रीन सी कासव वाहून आल्याचे कांदळवन प्रतिष्ठानचे सहाय्यक संशोधक मोहन उपाध्ये यांच्यानिदर्शनास आले. अंदाजे २०० किलो वजनाचे हे ग्रीन सीटर्टल त्याची लांबी



(डोकं ते शेपटी) १९० सेंमी, (६ फूट ३ इंच) पाठीची लांबी ६५ सेंमी, (२.११ फुट) रुंदी ६२.५सेंमी, (२ फुट) शेपटी ३६ सेंमी आहे.

पाण्याला ओहोटी लागल्यामुळे ते किनाऱ्यावर वाहून आले असावे हे लक्षात आले. वन कर्मचारी यांनी कासवाची तपासणी केली असता, त्याला कुठेही दुखापत झाल्याचे आढळुन आले नाही. मारळ येथील जयंत कानडे, संकेत मयेकर व हरिहरेश्वर येथील संतोष मयेकर, सुबोध खोपटकर कासव मित्र आणि कांदळवन विभागाचे अधिनस्त वनरक्षक तुषार बाप्पासाहेब भटे व ऋषिकेश विश्वास लव्हटे तसेच कासव तज्ञ मोहन उपाध्ये तसेच तेथील काही स्थानिक ग्रामस्थ आणि फेरी बोटीवर काम करणारी मुले यांचे साहाय्याने त्या कासवाला नैसर्गिक अधिवासात मुक्त करण्यात आले.

अशा प्रकारचे नर ग्रीनसीटर्टल कासव पहिल्यांदाच रायगड जिल्हयातील किनारपट्टीला लागल्याचे कळले आहे. यापूर्वी आसपासच्या किनाऱ्यावर किंवा खाडीत ग्रीन सीटर्टलच्या माद्या आढळल्या आहेत परंतु नर कासव सापडले अथवा आढळले अशी ही पहिलीच घटना रायगड जिह्यातील मौजे बागमांडला, श्रीवर्धन मधली आहे. अशाप्रकारे समुद्री कासव आढळल्यास त्वरीत कांदळवन विभागास कळविण्यात यावे, असे आवाहन विभागीय वन अधिकारी कांदळवन विभाग, दक्षिण कोकण कांचन पवार यांनी केले आहे.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## आ. मेहता च्या अहंकारमुळे मिरा भाईंदर महानगरपालिकेत युती होऊ शकली नाही : मंत्री सरनाईक



**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.०६, मिरा भाईंदर :** परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिनांक ५ जानेवारी २०२६ रोजी पत्रकार परिषद घेतली आणि खुलासा केला की, त्यांनी नरेंद्र मेहता यांची दोनदा भेट घेतली आणि मिरा भाईंदर महानगरपालिका निवडणुकीसाठी युती करण्यासाठी बोलणी केली. परंतु त्यांनी प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे मिरा भाईंदर मध्ये युती होऊ शकली नाही.

सरनाईक यांनी आरोप केला की, नरेंद्र मेहता यांनी युती करण्यापेक्षा वैयक्तिक लाभाला प्राथमिकता दिली. त्यांनी युतीसाठी भाजप कार्यालयात आपण ५० मिनिटे ताटकळत बसल्याचेही सांगितले. आमदार मेहता यांच्या आडमुठीपणामुळे मेट्रोचे काम राखडले. पाणी प्रश्न ही सुटला नाही. असे आरोप यावेळी मंत्री सरनाईक यांनी केले.

आयोजित पत्रकार परिषदेनंतर भाजपमधील पूर्व नगरसेवक अनिता मुखर्जी व विजय राय ह्यांनी शिवसेना (शिंदे गट) पक्षात प्रवेश केला. शिवसेनेची ताकद वाढली आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेत आमच्या स्वबळावर ५० जागा निवडून येणारच. व शिवसेनेचा महापौर होणार असा आत्मविश्वास मंत्री सरनाईक यांनी व्यक्त केला.

## न.लो.संस्था गुहागर शाखेचा १० जानेवारी रोजी वर्धापन दिन

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.०६, गुहागर :** नमन लोककला संस्था संलग्न गुहागर तालुका शाखेचा वर्धापनदिन सोहळा शनिवार दिनांक १० जानेवारी २०२६ रोजी दुपारी २ वाजता, भंडारी समाज भवन, गुहागर या ठिकाणी आयोजित करण्यात आला आहे.

सदर वर्धापन दिनाचे औचित्य साधत कोकणचे सांस्कृतिक वैभवात अधिक भर घालणारी कोकणची लोकप्रिय लोककला नमन या लोककलेचं जतन संवर्धन करणाऱ्या गाव / वाडी नमन मंडळ, नमन कलामंच यांना सन्मानित करण्यात येणार आहे. सदर सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून आमदार भास्करराव जाधव, माजी आमदार विनय नातू, महाराष्ट्र नवनिर्माण सेना गुहागर तालुका संपर्क अध्यक्ष प्रमोद गांधी,न. लो. संस्था अध्यक्ष रवींद्र मटकर, गुहागर शहर नगराध्यक्षा नीता मालप आदी सामाजिक/राजकीय क्षेत्रातील दिग्गज मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.

न. लो. संस्था तालुका शाखा सचिव संदीप कानसे अधिक यांनी माहिती देताना सांगितले की गेली पाच वर्षे गुहागर तालुक्यातील गाव /वाडी नमन मंडळ, नमन कलामंच, निर्माते,कलाकार यांना संघटित करण्याचे काम चालू असून जवळ जवळ ७५ पेक्षा अधिक नमन मंडळानी गुहागर तालुका शाखेकडे आपली नोंद करत संघटित झाले आहेत. वर्धापन दिन पूर्व सचिव संदीप कानसे यांनी पुन्हा आवाहन केले आहे की ज्या नमन मंडळांची गुहागर तालुका शाखेकडे अजून नोंदणी झाली नसल्यास सदर नमन मंडळांच्या प्रतिनिधींनी यांनी गुहागर तालुका शाखा प्रतिनिधी : जगन्नाथ शिंदे-९५४५८३५३०१, सुधीर टाणकर -९४२११३७२८९, प्रमोद घुमे-९०४९८४४७८८ यांच्याकडे संपर्क साधून नोंद करून घ्यावी. त्याच बरोबर गुहागर तालुका शाखा वर्धापन दिन सोहळा व त्याचे औचित्य साधत नमन मंडळांच्या सन्मानित सोहळ्याला बहुसंखेने उपस्थितीत राहण्याचे आवाहन, न.लो. संस्था -गुहागर तालुका शाखा सचिव संदीप कानसे यांनी केले आहे.

## शिक्षक परिषदेच्या पाठीशी सदैव उभे राहू : आ. करण देवतळे



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि. ०५ वरोरा (चंद्रपूर) :** महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभाग ही राज्यातील प्राथमिक शिक्षकांच्या समस्या/मागण्या त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांप्रती समर्पित एकमेव अग्रेसर संघटना असून तिच्या पाठीशी सदैव उभे राहू, असे स्पष्ट मत महाराष्ट्र विधानसभा सदस्य करण देवतळे यांनी शनिवार दिनांक ३ जानेवारी २०२६ रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीदिनी आयोजित महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभाग चे दिनदर्शिका विमोचन कार्यक्रम प्रसंगी संघटना प्रतिनिधी यांचे समोर व्यक्त केले. आ. करण देवतळे यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळांना खनिज विकास निधीतून ई-लर्निंग संच उपलब्ध करून दिले. त्याबद्दल राज्य कार्याध्यक्ष प्रकाश चुनारकर यांचे हस्ते आ. करण देवतळे यांचा सत्कार करण्यात आला. महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभाग ही संघटना विशिष्ट ध्येयाने प्रेरित संघटना असून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ताठ मानेने उभे राहण्यासाठी प्राथमिक शिक्षकांनी प्रयत्न करून 'आमचे गाव, आमचीच शाळा ' ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभागाचे राज्य कार्याध्यक्ष प्रकाश चुनारकर यांनी उपस्थित संघटना पदाधिकारी यांना केले. शाळांमध्ये वाढते ऑनलाईन कामे त्यामुळे शैक्षणिक गुणवत्तेकडे होत असलेले दुर्लक्ष त्याचप्रमाणे अपूरी शिक्षक संख्या याकडे महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद चे जिल्हाध्यक्ष विलास खोंड यांनी आमदारांचे लक्ष वेधले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अमोल देठे जिल्हाध्यक्ष चंद्रपूर, संचालन रंगनाथ मत्ते, आभार प्रदर्शन विलास खाडे जिल्हा कार्यवाह चंद्रपूर यांनी केले. स्वागत गीत दिगंबर खुळसंगे यांनी गायले. यावेळी विकास घागी, सुरेश येन्नावार, ऋषी मेश्राम यांचा सत्कार आ. करण देवतळे यांनी केला. स्मरणिका दिनदर्शिका प्रकाशनाचे परिषदेचे हे सातवे वर्ष आहे. राज्य कार्याध्यक्ष प्रकाश चुनारकर यांनी चंद्रपूर जिल्ह्यातून सुरू केलेली महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभाग ही संघटना राज्यभरात पोहचली असून त्याचे नेतृत्व राज्य कार्याध्यक्ष राजेश सुर्वे, राज्य कोषाध्यक्ष प्रकाश चतरकर, राज्य कार्यवाह संजय पगार राज्य कार्याध्यक्ष प्रकाश चुनारकर यांचे मार्गदर्शनाखाली करीत असल्याचे जिल्हाध्यक्ष अमोल देठे यांनी कार्यक्रमप्रसंगी मत व्यक्त केले. कार्यक्रमाला विलास बोबडे विभाग कार्यवाह, अजय बेदरे जिल्हा कोषाध्यक्ष, विजयालक्ष्मी पुरेड्डीवार जिल्हा कार्याध्यक्ष यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी राजेंद्र पांडे, सतीश दुवावार, दिलीप राठोड, सतीश डांगरे, आनंद वेलादी, नरेंद्र चौखे, सुनील टोंगे, सतीश डांगरे, विकास घागी, किरण लांडे, संचित जांभूळे, विनोद बाळेकरमकर, संदीप गराटे, स्वप्नील लुथडे आदी संघटना पदाधिकारी प्रयत्नशील होते.

# पाटण तालुक्यातील तब्बल ६१ पाणंद रस्ते खुले; १० हजार शेतकऱ्यांना होणार फायदा

## पाणंद रस्ते जीआयएस नकाशावर उपलब्ध...



**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.०७, पाटण :** पाटण महसूल विभागामार्फत पाटण तालुक्यातील तब्बल ६१ पाणंद रस्ते खुले करण्यात आले आहेत. शेतकरी व ग्रामीण भागातील नागरिकांना शेतशिवार व गावातील मार्गाचा सुलभतेने उपयोग करता यावा यासाठी प्रांताधिकारी सोपान टोम्पे, तहसीलदार अनंत गुरव यांच्यासह महसूल कर्मचाऱ्यांनी विशेष प्रयत्न करून ही मोहीम यशस्वीपणे राबविली आहे. यामुळे १० हजार १०६ शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. त्याबद्दल शेतकऱ्यांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.

अनेक वेळा खुले करण्यात आलेले पाणंद रस्ते कालांतराने पुन्हा अतिक्रमणाखाली जात असल्याचे आढळते. तसेच, कोणते रस्ते खुले करण्यात आले आहेत, ते किती अंतरापर्यंत खुले आहेत, याबाबत नकाशा-आधारित माहिती उपलब्ध नसल्याने अडचणी निर्माण होत होत्या. सदर बाबी लक्षात घेऊन जिल्हाधिकारी संतोष पाटील यांच्या संकल्पनेतून आणि मार्गदर्शनाखाली प्रांताधिकारी सोपान टोम्पे, तहसीलदार अनंत गुरव व महसूल कर्मचाऱ्यांच्या संयुक्त प्रयत्नातून पाटण तालुक्यातील ६१ पाणंद रस्ते खुले करण्यात आलेले असून ते पाणंद रस्ते जीआयएस प्रणालीवर नोंदविण्यात आले आहेत. यामध्ये येराड मंडलातील बनपेठवाडी (६), तामकडे, मल्हारपेठ विभागातील नाडे, मंद्रुळहवेली, येराडवाडी, निसरे, गिरेवाडी, ठोमसे (३), उरूल (२), बोडकेवाडी, म्हावशी मंडलातील अडुळ, चाफोली (२), जुंगटी (४), हेळवाक मंडलातील कामरगाव, हुंबरळी, देशमुखवाडी (कोयनानगर रोड), दास्तान, रासाटी, कामरगाव, तारळे मंडलातील तारळे, भुडकेवाडी (२), ढेबेवाडी मंडलातील भोसगाव, बनपुरी, मोरगिरी मंडलातील मोरगिरी, कोकिसरे (७), आवर्डे मंडलातील जळव, जांभेकरवाडी (२), मालोशी (२), कुठरे मंडलातील पवारवाडी (३), पाटण मंडलातील कुसवडे (३), गावडेवाडी, जाईचीवाडी, वन, चाफळ विभागातील चाफळ, डेरवण-वाघजाईवाडी (२), डेरवण (३), तळमावले मंडलातील साईकडे आदी ठिकाणचे एकूण ६१ पाणंद रस्ते प्रशासनाकडून खुले करण्यात आले आहेत. यामुळे तब्बल १० हजार १०६ शेतकऱ्यांना याचा भविष्यात फायदा होणार आहे.

या कार्यासाठी कोणत्याही बाह्य यंत्रणेची मदत न घेता, महसूल विभागातील कर्मचाऱ्यांनी स्वतःच्या प्रयत्नांतून व कोणताही अतिरिक्त खर्च न करता हे काम पूर्ण केलेले आहे. या उपक्रमामुळे तालुक्यातील सर्व खुले पाणंद रस्ते नकाशावर पाहण्याची सुविधा नागरिकांना उपलब्ध झाली आहे. भविष्यात रस्त्यांवर झालेल्या अतिक्रमणांचे निदान व पडताळणी करणे सुलभ होणार आहे. यामुळे महसूल विभागाच्या कार्यात पारदर्शकता व कार्यक्षमतावाढण्यास मदत होईल.

सदर जीआयएस नकाशे सातारा जिल्हा प्रशासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर डब्ल्यु डब्ल्यु डब्ल्यु डॉट सातारा डॉट जीओव्ही डॉट इन या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहेत. नागरिकांनी आपल्या तालुक्यातील व गावातील खुले करण्यात आलेले पाणंद रस्ते पाहण्यासाठी या संकेतस्थळाचा उपयोग करावा, असे आवाहन महसूल विभागाकडून करण्यात आले आहे.

# कोकणची हळवी नाती जपणारी उद्योजिका प्रियांका गांधी यांना उद्योगरत्न पुरस्कार २०२६ जाहीर



**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.०६, गुहागर :** समाजात हळवी नाती जपणारी गुहागरची कन्या,महाराष्ट्र नवनिर्माण सेना, गुहागर तालुका संपर्क अध्यक्ष प्रमोद सिताराम गांधी यांच्या सौभाग्यवती प्रियांका प्रमोद गांधी यांना वैश्य समाजामार्फत उद्योगरत्न म्हणुन सन्मानित होण्याचा बहुमान प्राप्त झाला असून वैश्य ग्लोबल चॅरिटेबल ट्रस्ट तर्फे रविवार दिनांक ११ जानेवारी २०२६ रोजी आर, एम, एम, एस, हॉल, परळ मुंबई येथे आयोजित यशोत्सव-२०२६ ह्या भव्य दिव्य सोहळ्यात प्रियांका गांधी यांना उद्योगरत्न पुरस्कार-२०२६ ने गौरविण्यात येणार आहे.

मुंबईतील प्रत्येक खवय्याला, मुंबईतच अस्सल कोकणी जेवणाचा आस्वाद घेता यावा आणि तोही अगदी गावरान वातावरणाचा आनंद घेता यावा या संकल्पनेतून कोकणच्या प्रियांका गांधी यांनी अस्सल चवीचा कोकण कट्टा या रेस्टॉरंट ची ९ वर्षांपूर्वी मुहूर्तमेढ रोवली.

कोकणातीलच रोहे गावी जन्मलेल्या प्रियांकांचं बालपण जरी मुंबईत गेलं तरी त्यांच्या मनात मात्र कोकण कायम होतं. सुरुवातीची १० वर्षे नोकरी करत असताना देखील त्यांच्या मनात सतत काहीतरी वेगळे करण्याची ऊर्जा होती. विवाहानंतर पती प्रमोद गांधी यांनी त्या ऊर्जेला नेहमीच प्रोत्साहन देत सरकारी कॅन्टीनच्या जेवणाचे मॅनेजमेंट हाती घेऊन त्यांनी या क्षेत्रातील त्यांचे पहिले पाऊल टाकले. त्यानंतरचा प्रवास हा नक्कीच सोपा नव्हता, पारंपरिक पद्धती आणि मसाले वापरून स्टाफ कडून मोठ्या प्रमाणावर जेवण करून घेणे हे काम बरेच आव्हानात्मक होते, परंतु जिद्द, परिश्रम आणि कुटुंबीयांची सोबत याच जोरावर त्या एक एक पायरी चढत राहिल्या. आणि अखेरीस २०१६ साली अंधेरीत अस्सल चवीचा कोकण कट्टा जन्माला आला, रेस्टॉरंटची व्यवस्था एकट्याने हाती घेतली.

पार्सल काउंटर ते १५ ते २० आसनी रेस्टॉरंट ही मजल खरच प्रेरणादायी होती, अवघ्या काही कालावधीत त्यांनी मालाड या ठिकाणी देखील दुसरी शाखा उघडली आणि अस्सल कोकणी जेवणाचा परीघ अजून रुंदावला, आय,एच,एम (IHM) चेन्नई येथून हॉटेल मॅनेजमेंट चे शिक्षण घेतलेला त्यांचा चिरंजीव विक्रांत गांधी हा देखील आईच्या मार्गदर्शनाखाली मुंबई येथील मालाड ची शाखा सांभाळतो आहे.

कोकणी जेवणावर प्रेम करणाऱ्या असंख्य टीव्ही आणि सिनेक्षेत्रातील कलाकार आणि इतर सेलिब्रिटी व्यक्तींनी कोकण कट्टाला भेट दिली आहे आणि सगळ्याच कोकणप्रेमी लोकांच्या गळ्यातील तो ताईत बनला आहे असं म्हणायला हरकत नाही, अस्सल चवीचा कोकण कट्टा च्या शिरपेचात अजून एक मानाचा तुरा वैश्य समाजातील उद्योजकाना प्रेरणा देणाऱ्या वैश्य ग्लोबल चॅरिटेबल ट्रस्ट या संस्थेच्या पुरस्काराने खोवला गेला आहे, ही शाबासकी ची थाप आमचा आणि आमच्या स्टाफ चा आनंद नक्कीच द्विगुणित करेल,आपल्या समाजाने, आपल्या माणसांनी,आपल्याच माणसांसमोर केलेला सत्कार हा एक वेगळाच आनंद देऊन जातो, अशी हळवी प्रतिक्रिया पुरस्कार प्रति व्यक्त होताना प्रियांका गांधी यांनी दिली.

# 'दैं.अक्षराज'च्या बातमीचा 'दणका' !

## कृष्णवाडीत वनविभाग ॲक्शन मोडवर; तात्काळ पिंजरा तैनात, शाळेलाही मिळाले सुरक्षा कंपाउंड

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०६, विंचूर (नाशिक) :** निफाड तालुक्यातील विंचूर शहरालगत असलेल्या किसनवाडी (कृष्णवाडी) परिसरात बिबट्याच्या मुक्त संचाराने उडालेल्या घबराटीनंतर 'दै अक्षराज'ने दिलेल्या बातमीचा मोठा इम्पॅक्ट झाला आहे. या बातमीची आणि वनविभागाला दिलेल्या माहितीची गंभीर दखल घेत, वनविभागाने अवघ्या काही तासांतच ॲक्शन मोड मध्ये येत परिसरात पिंजरा तैनात केला आहे. विशेष म्हणजे, प्रशासनाने देखील तत्परता दाखवत येथील जिल्हा परिषद शाळेला तातडीने सुरक्षा कंपाउंड (कुंपण) केल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न मार्गी लागला आहे.

किसनवाडी परिसरात स्थानिक शिक्षक केंद्रे व क्षीरसागर यांना बिबट्याचे दर्शन झाले होते. त्यांनी आणि पत्रकार सुनील क्षिरसागर यांनी प्रसंगावधान राखत तात्काळ ही माहिती वनविभागाला दिली. या घटनेचे गांभीर्य ओळखत आणि बातमी प्रसिद्ध होताच वनविभागाच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली.

**अधिकारी 'ऑन फिल्ड'; लावला पिंजरा!**

बिबट्याची माहिती मिळताच वनपरिक्षेत्र अधिकारी (येवला)- राहुल घुगे, वनपरिमंडळ अधिकारी - जयप्रकाश शिरसाठ, वनरक्षक (विंचूर)- विजय दोंदे आणि निफाड येथील आधुनिक बचाव पथक यांनी संयुक्त रित्या धडक मोहीम राबवली. कोणताही विलंब न लावता बिबट्याला जेरबंद करण्यासाठी मोक्याच्या ठिकाणी पिंजरा लावण्यात आला आहे. वनविभागाच्या या 'झिरो रिस्पॉन्स टाईम' आणि कार्यतत्परतेचे स्थानिक नागरिकांनी कौतुक केले असून आभार मानले आहेत.

**तात्पुरता दिलासा नको, 'शाश्वत' तोडगा हवा!**

वनविभागाने पिंजरा लावला असला तरी ग्रामस्थांमध्ये दहशतीचे वातावरण कायम आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, या भागात बिबट्या येण्याची ही पहिलीच वेळ नाही. अनेकदा बिबट्याला जेरबंद करून दूर जंगलात सोडले जाते, मात्र काही दिवसांनी तो पुन्हा मानवी वस्तीकडे वळतो. त्यामुळे बिबट्याला केवळ पकडून सोडून देण्यापेक्षा, प्रशासनाने बिबट्यांची नसबंदी करणे किंवा त्यांच्या कायमस्वरूपी बंदोबस्तासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी आग्रही मागणी किसनवाडीतील नागरिकांनी केली आहे. काल पुन्हा रात्रीच्या वेळी दोन बिबट्यांची मारामारी लक्ष्मण मोरे यांच्या वावरात काही नागरिकांनी बघीतली आणि वावरातील पिकांची पूर्ण नासाडी झाली आहे.

**: वनविभागाने नागरिकांना, दिला सतर्कतेचा इशारा :**

बिबट्याचा वावर लक्षात घेता वनविभागाने गावकऱ्यांना खालीलप्रमाणे सूचनांचे पालन करण्याचे आवाहन केले आहे

- **मुलांची सुरक्षा :** बिबट्या लहान मुलांवर हल्ला करण्याची शक्यता असल्याने पालकांनी मुलांची विशेष काळजी घ्यावी, त्यांना एकटे सोडू नये.
- **रात्रीचा प्रवास :** रात्रीच्या वेळी या परिसरात दुचाकीवरून व पाई चालणे प्रवास करणे शक्यतो टाळावे.
- **सुरक्षा साधने :** शेतात किंवा बाहेर पडताना हातात काठी, बॅटरी (टॉर्च) आणि मोबाईल सोबत ठेवावा.

वनविभागाचे कर्मचारी व आधुनिक बचाव पथक परिस्थितीवर बारीक लक्ष ठेवून आहेत.

# क्षयरोग मुक्त ठाण्यासाठी आरोग्य विभागाची प्रभावी मोहीम

## एआय एक्स-रे तपासणीतून ठाणे जिल्ह्यात १४ हजारांहून अधिक नागरिकांची तपासणी

**अक्षराज : विकास दळवी**

**दि.०६, ठाणे :** भारत सरकार व महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार ठाणे जिल्ह्यात राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रम (National TubeA°culosis Elimination Programme - NTEP) संपूर्ण जिल्हाभर प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. हा कार्यक्रम जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे रणजित यादव यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे अंमलात आणला जात असून, कार्यक्रमाची अंमलबजावणी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.कैलास पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.गंगाधर परगे व प्रभारी जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. दिनेश सुतार यांच्या अधिपत्याखाली करण्यात येत आहे. शासकीय आरोग्य संस्था, खासगी वैद्यकीय व्यावसायिक तसेच सामाजिक संस्थांच्या समन्वयातून हा कार्यक्रम प्रभावीपणे राबविला जात आहे.



या कार्यक्रमांतर्गत क्षयरोगाचा लवकर शोध, मोफत व दर्जेदार उपचार, नियमित औषधोपचार, रुग्णांना पोषण सहाय्य तसेच उपचार पूर्ण होईपर्यंत रुग्णांचा सतत पाठपुरावा यावर विशेष भर देण्यात येत आहे. रुग्णांचे उपचारात सातत्य राहावे यासाठी समुपदेशन व मार्गदर्शन करण्यात येत असून, उपचार प्रक्रियेवर काटेकोर देखरेख ठेवली जात आहे.टीबी मुक्त भारत अभियान तसेच मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत जिल्ह्यातील अतिजोखमीच्या लोकसंख्येची क्षयरोगासाठी तपासणी मोठ्या प्रमाणावर करण्यात येत आहे. यासाठी विशेषतः एक्स-रे तपासणीवर भर देण्यात येत असून, एआय (AI) आधारित Hand Held X-Ray मशीनच्या सहाय्याने गावोगावी तपासणी शिबिरे आयोजित करण्यात येत आहेत. या शिबिरांद्वारे अतिजोखमीच्या लोकांची तात्काळ तपासणी करून संभाव्य रुग्णांची ओळख पटविण्यात येत आहे. महत्त्वाचे म्हणजे, एआय हँड हेल्ड एक्स-रे मशीनच्या माध्यमातून जानेवारी २०२५ ते डिसेंबर २०२५ या कालावधीत जिल्ह्यात एकूण १४,०८० व्यक्तींची तपासणी करण्यात आली असून, त्यापैकी २,४९३ व्यक्ती संशयित आढळून आल्या आहेत. या संशयितांपैकी १,९३७ व्यक्तींची थुंकी नमुना तपासणी करण्यात आली असून, त्यामधून २३ व्यक्ती क्षयरोग बाधित असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे जिल्ह्यात थुंकी नमुना तपासणीसह एआय आधारित हँड हेल्ड एक्स-रे मशीन अत्यंत उपयुक्त ठरत असून, संशयित रुग्णांची तात्काळ तपासणी करून त्यांना त्वरित उपचारांखाली आणणे शक्य होत आहे.

जानेवारी २०२५ ते डिसेंबर २०२५ या कालावधीत बदलापूर, भिवंडी, कल्याण, मुरबाड व शहापूर या तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर एक्स-रे तपासण्या करण्यात आल्या असून, भिवंडी व मुरबाड तालुक्यांमध्ये तुलनेने अधिक क्षयरोग रुग्ण आढळून आले आहेत. या आकडेवारीवरून जिल्ह्यातील अतिजोखमीच्या भागांमध्ये लक्ष केंद्रीत करून तपासणी व उपचार अधिक प्रभावीपणे राबविले जात असल्याचे स्पष्ट होते.

क्षयरोग बाधित रुग्णांना निक्षय पोषण योजना अंतर्गत दरमहा आर्थिक सहाय्य देण्यात येत असून, उपचारात सातत्य राखण्यासाठी रुग्णांना वेळोवेळी समुपदेशन व मार्गदर्शन करण्यात येत आहे. तसेच निकषानुसार अत्याधुनिक चाचण्या (CBNAAT / Truenat) तसेच औषधप्रतिरोधक क्षयरोगासाठी (M¦R-TB) विशेष उपचार सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत.जिल्ह्यातील नागरिकांनी दीर्घकाळ खोकला, ताप, वजन घटणे, रात्री घाम येणे अशी लक्षणे आढळल्यास त्वरित जवळच्या शासकीय आरोग्य संस्थेत तपासणी करून घ्यावी, असे आवाहन आरोग्य विभागामार्फत करण्यात आले आहे. क्षयरोग हा पूर्णपणे बरा होणारा आजार असून, वेळेवर निदान व नियमित आणि पूर्ण उपचार घेतल्यास रुग्ण पूर्णपणे बरा होतो, असेही आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे.

# नितीन काळे यांच्या हस्ते बोरखेडा येथे रस्ता व स्मशानभूमीचे भूमिपूजन



**अक्षराज : विकास वाघ**

**दि.०६, धाराशिव :** बोरखेडा गावाच्या सर्वांगीण विकासाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून गावातील रस्ता, शेतरस्ते व स्मशानभूमीचे भूमिपूजन भाजपा नेते नितीन काळे यांच्या हस्ते संपन्न झाले. गावकऱ्यांच्या दैनंदिन सोयीसुविधा, स्वच्छता तसेच मूलभूत गरजांचा विचार करून ही विकासकामे मार्गी लावण्यात आली आहेत. ही विकासकामे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या माध्यमातून मंजूर निधीतून करण्यात येत असून, यामुळे गावाच्या विकासाला भक्कम पाठबळ मिळाले आहे.

तसेच आगामी काळात बोरखेडा गावामध्ये ५० लाख रुपयांपेक्षा जास्त रकमेची विविध विकासकामे लवकरच सुरू होणार असून, यामुळे गावाच्या पायाभूत सुविधा अधिक मजबूत होतील व विकासाला नवी गती मिळेल. लोकसहभाग, विश्वास आणि विकास यांचा संगम साधत बोरखेडा गाव प्रगतीच्या नव्या वाटेवर पुढे जात असल्याचे यावेळी उपस्थित मान्यवरांनी सांगितले. गावाचा विकास, हीच खरी सेवा या भावनेतून ही कामे राबविण्यात येत असल्याचे नमूद करण्यात आले. यावेळी उपस्थितांना विकासाला साथ द्या, राणा दादांना साथ द्या असे आवाहन करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून बालाजी गावडे यांची उपस्थिती लाभली. तसेच नितीन काळे, नितीन शेरखाने, साधु पुरी महाराज, रामेश्वर पाटील, प्रेमनाथ पाटील, जगनाथ सुरवसे, हनुमंत कवडे, दिलीप गायकवाड यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वर्षभरात केवळ ७८ दिवसच आरोग्यदायी ठरले

## चंद्रपूर शहरात ३६५ पैकी २०१ दिवस जास्त प्रदूषित

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०६, चंद्रपूर :** केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि महाराष्ट्र प्रदूषण मंडळाद्वारे दररोज २४ तास घेण्यात येणाऱ्या सतत हवा गुणवत्ता निरीक्षणाचा २०२५ ह्या मागील वर्षातील प्रदूषणाची आकडेवारी पाहता ३६५ दिवसात चंद्रपूरमध्ये केवळ ७८ दिवस प्रदुषण मुक्तीचे ठरले असून हे दिवसच आरोग्यदायी ठरल्याचे अहवालात नमूद आहे. मात्र, ८६ दिवस समाधानकारक, १८७ दिवस प्रदूषणाचे, १३ दिवस जास्त प्रदूषणाचे ठरले, तर १ दिवस अति प्रदुषित आढळला. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निरीक्षणाच्या आधारे ही धक्कादायक आकडेवारी येथील पर्यावरण अभ्यासक आणि ग्रीन प्लॅनेट सोसायटीचे अध्यक्ष प्रा.सुरेश चोपने यांनी दिली आहे. शहरात धोकादायक श्रेणीतील प्रदूषण नोंदले गेले नाही. चंद्रपूर जिल्ह्यासोबतच, शहरात आणि औद्योगिक क्षेत्र खुटाळा येथे सतत वायू गुणवत्ता निरीक्षण केंद्राद्वारे वायू प्रदूषणाची नोंद घेतल्या जाते. तिथे शहरांपेक्षा जास्त प्रदूषण आढळते. प्रस्तूत आकडेवारी शहरातील बस स्थानक जवळ असलेल्या केंद्रीय प्रदूषण मंडळाच्या केंद्रातील आहे, ही जरी शासकीय यंत्रणेद्वारे घेतलेली नोंद असली तरी अनेक ठिकाणी त्यापेक्षाही जास्त प्रदूषण पाहायला मिळते. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची प्रदूषणाची पुरेशी आकडेवारी उपलब्ध नाही परंतू जिल्ह्यातील ४ औद्योगिक क्षेत्रात घुग्गुस आणि राजुरा येथे जास्त प्रदूषण आहे.

**पावसाळ्यात कमी प्रदूषण –**

चंद्रपूर च्या मागील काही वर्षात पावसाळा हा साधारणता आरोग्यदायी मानला जात होता परंतू काही वर्षात पावसाळ्यात सुद्धा प्रदूषण आढळले. मागील पावसाळी १२२ दिवसात चांगले ५९ दिवस आढळले. समाधानकारक ५१ दिवस, प्रदूषित १२ दिवस आढळले परंतू अति प्रदुषित दिवस आढळले नाही. पावसाळ्यातील एकूण ४ महिन्यातील १२२ दिवसांपैकी १२ दिवस प्रदूषण होते. मागील वर्षी अतिशय पावसामुळे पावसाळ्यात प्रदूषण कमी झाले.

**हिवाळा अतिशय प्रदुषित –**

खरं तर हिवाळा हा ऋतू अतिशय आरोग्यदायी असतो परंतू अलीकडे सर्व शहरे ही प्रदुषित झाल्यामुळे हा ऋतू सुध्दा प्रदूषणामुळे आरोग्यासाठी अतिशय हानिकारक ठरु लागला आहे. भौगोलिकदृष्ट्या संथ हवा आणि कमी तापमान हे जास्त प्रदूषणास कारणीभूत ठरतात. ह्या ऋतूतील चांगले दिवस १४, समाधानकारक १४ दिवस, मध्यम प्रदूषण ९२ दिवस तर सर्वाधिक प्रदूषणाचे ३ दिवस आढळले. हिवाळ्यातील एकूण १२३ दिवसांपैकी ९५ दिवस प्रदूषण होते.

**उन्हाळ्यात प्रदूषण –**

उन्हाळ्यातील फेब्रुवारी, मार्च, एप्रिल, मे ह्या महिन्यात सुध्दा प्रदूषण अधिक आढळले. ह्या ऋतूतील चार महिन्यात केवळ ५ दिवस चांगले, २१ दिवस समाधानकारक, ८३ दिवस प्रदुषित आणि ११ दिवस अति प्रदूषित आढळले.

# कामोठे चेकनाका येथे १७ लाखांची रोकड जप्त

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०६, पनवेल :** महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ साठी आचारसंहिता लागू झाली आहे. यानुसार पनवेल मतदारसंघ, निवडणूक विभागांतर्गत आचारसंहिता पथकांतर्गत स्थिर सर्वेक्षण पथक क्रमांक ३ (एसएसटी पथक) ने पनवेल जवळील कामोठे चेकनाका येथे नियमित वाहन तपासताना सायन पनवेल हायवे रोडवरून जाणाऱ्या ग्रॅन्ड विटारा पांढऱ्या रंगाच्या गाडीची तपासणी केली. यात कापडी पिशवीमध्ये १७ लाख रोख रक्कम आढळून आली. ही रक्कम संशयास्पद असल्याने ही रक्कम पथकामार्फत जप्त करण्यात आली.

ही कारवाई पनवेल महानगरपालिका निवडणूक अधिकारी मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. प्रभाग ११, १२, १३ चे निवडणूक निर्णय अधिकारी अविशकुमार सोनोने यांच्याद्वारे ही तक्रार देण्यात आली. या कारवाईवेळी आचारसंहिता पथक प्रमुख तथा अतिरिक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे, समन्वय अधिकारी तथा उपायुक्त रविकिरण घोडके, समन्वयक तथा अधिक्षक मनोज चव्हाण, पथक प्रमुख स्थिर सर्वेक्षण पथक क्र.३ ग्रामविकास अधिकारी, सुदिन धनाजी पाटील, पथक सदस्य नरेंद्र गावंड, प्रशांत फडके, कामोठे पोलीस स्टेशनचे पोलिस शिपाई जितेश नवघरे, श्रीवंता अक्षय सुर्यवंशी उपस्थित होते. या तक्रारीच्या अनुषंगाने पुढील कार्यवाहीसाठी आयकर विभागास सूचित करण्यात आले असून त्याच्यावतीने पुढील प्रक्रिया सुरू आहे.

# थोडक्यात

## वारकरी संप्रदायसाठी मोठी दुःखद बातमी; मारुती महाराज राणे यांचे निधन



**अक्षराज : स्वप्नील देशमूख**

**दि.०६, कर्जत (रायगड) :** वारकरी संप्रदायासाठी मोठा आघात, गुरुमाऊली वै.ह.भ.प मारुती महाराज राणे यांचं निधन कर्जत - हलीवली येथील गुरुमाऊली वै.ह.भ.प. मारुती महाराज राणे यांचं अल्पशा आजाराने दुःखद निधन झालं आहे. वारकरी संप्रदायातील एक जेष्ठ कीर्तनकार, प्रवचनकार अशी त्यांची ख्याती सर्वदूर पसरली होती. समाजातील जीवनाचा मार्ग चुकलेल्या अशा अनेक दिशाहीन व्यक्तींना योग्य दिशा दिली. जीवनाचा सार समजले. कीर्तनाच्या, प्रवचनाच्या माध्यमातून असंख्य शिष्याना संस्कारुपी घडवले आणि आजच्या घडीला तेच शिष्य येणाऱ्या पिढीला संस्काररुपी धडे देत आहेत.गुरुमाऊलींच्या मार्गदर्शनाखाली अनेक जिल्ह्यातील ग्रामीण भागात अखंड हरीनाम सप्ताह सुरु झाले आहेत. लोकांमध्ये धार्मिकता अध्यात्मिकता वाढली तसेच समाजाप्रती आदर वाढला आहे. गुरुमाऊलींच्या मते श्री पांडुरंगाची भक्ती हीच मोठी शक्ती आहे,नित्यनियमाने नामस्मरण करा तुमचं जीवन सुखकर होईल. गुरुमाऊलींच्या कार्याची दखल घेऊन रायगड जिल्हा परिषदने माऊलींना रायगड भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. माऊलींच्या दुःखद निधनामुळे संपूर्ण वारकरी संप्रदायात शोककळा पसरली आहे. माऊलींच्या कुटूंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. हे दुःख सहन करण्यासाठी परमेश्वर त्यांना शक्ती देवो तसेच मृत आत्म्यास चिरशांती लाभो हीच परमेश्वर चरणी प्रार्थना करतो. गुरुमाऊलींची शिकवण, त्यांचे विचार, त्यांचे आचार, त्यांनी दिलेले संस्कार पुढच्या पिढीला सांगणं हेच आपलं आद्य कर्तव्य आहे आणि हीच खऱ्या अर्थाने गुरुमाऊलींना श्रद्धांजली आहे.

## पेणमधील हजरत पीर सय्यद बद्रुद्दीन शाह हुसैनी दर्ग्यावर हजारो भाविकांची हजेरी



**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.०६, पेण (रायगड) :** हिंदू - मुस्लिम ऐक्याचे प्रतिक असलेल्या पेण तालुक्यातील निसर्गाच्या कुशीत वसलेल्या हजरत पीर सय्यद बद्रुद्दीन शाह हुसैनी यांचा उर्स निमित्त हजारो भाविकांनी आपली हजेरी लावली. पेण शहरापासून ७ किमी असलेल्या डोंगराळ भागात बळवली, मुंगोशी गावालगत असलेल्या सांक्षी किल्ल्याच्या पायथ्याशी हजरत पीर सय्यद बद्रुद्दीन शाह हुसैनी दर्गा असुन या ठिकाणी पौष पौर्णिमेला उर्स भरतो. यंदा दिनांक ०३ जानेवारी २०२६ रोजी संदल शरीफ वदिनांक ०४ जानेवारी २०२६ रोजी सुप्रसिद्ध कव्वाल हाजी सुलतान नाझा यांच्या कव्वाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उर्सासाठी पेणसह ठाणे, मुंबई, पनवेल, रोहा, महाड, पुणे या ठिकाणाहुन मोठ्या प्रमाणात भाविक चादर चढवण्यासाठी येत असतात. साधारणतः बद्रुद्दीन हुसैनी बाबाच्या उर्सासाठी लाखो भाविक दर्गाला भेट देउन दर्शन घेत असतात. या दर्ग्यावर सेवेकरी म्हणून असलेले मुजावर यांचे कुटुंबीय गेली अनेक वर्षे सेवा करीत असून त्यांच्या परिवारातील इश्तियाक मुजावर हे वर्षानुवर्षे हे येणाऱ्या जाणाऱ्या भाविकांची सोय सुविधा करीत असतात. गेली कित्येक वर्षे बाबांच्या चरणी लीन होऊन ते सेवा करीत आहेत. या उर्सावेळी संदलच्या दिवशी पहिली चादर चढविण्याचा मान तहसिल कार्यालयाचा असतो तसेच दुसरी चादर पोलिसांची असते. यंदा तहसिल कार्यालयाच्या वतीने नायब तहसिलदार प्रसाद कालेकर व पोलीस प्रशासनच्या वतीने उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकुल यांच्या हस्ते बाबांच्या दर्ग्यावर चादर चढविण्यात आली. त्यांनतर मुजावर कुटुंबीयांच्या वतीने चादर चढविण्यात आली. या प्रसंगी पेण पोलीस निरीक्षक संदीप बागुल हे उपस्थित होते. ही अनोखी प्रथा गेली कित्येक वर्षे सुरू असुन या प्रथेमध्ये हिंदू मुस्लिम सर्व एकत्र पहायला मिळतात. या उर्साला अन्न दानाची मोठी प्रथा असून प्रत्येकजण आपआपल्या परिने येणाऱ्या भाविकांसाठी अन्नदाची सोय करतात. या उर्सामध्ये आकाश पाळणे, मिठाईची दुकाने, खेळण्याची दुकाने, शाकाहारी, मांसाहरी खव्वयांसाठी मोठ-मोठी व गर्दीने सर्व परिसर दुमदुमलेला असतो.

## पथनाट्याच्या माध्यमातून स्वीप पथकांतर्फे कळव्यामध्ये जनजागृती

**अक्षराज : विकास दळवी**

**दि.०६, ठाणे :** मतदानाचा टक्का वाढावा किंबहुना जास्तीत जास्त नागरिकांनी आपला मतदानाचा हक्क बजावावा यासाठी स्वीपच्या माध्यमातून कळवा विभागात पथनाट्याच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येत आहे. आयुक्त तथा निवडणुक अधिकारी सौरभ राव यांच्या सूचनेनुसार स्वीप उपक्रमाच्या नोडल अधिकारी डॉ. मिताली संचेती यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात मोठ्या प्रमाणावर जनजागृती करण्यात येत आहे. कळवा प्रभाग समिती अंतर्गत प्रभाग क्र. २४ मधील वाघोबा नगर, दुर्गादेवी परिसरात पथनाट्य सादर करण्यात आले. या पथनाट्यातून नागरिकांना १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान असून या दिवशी प्रत्येकाने आपला हक्क बजावावा असा संदेश देण्यात आला. या पथनाट्यात सरस्वती शाळा व महाविद्यालयातील शिक्षक व विद्यार्थ्यांनी देखील सहभाग घेतला. तसेच पथनाट्य सादरीकरणादरम्यान मोठ्या प्रमाणावर परिसरातील नागरिक उपस्थित होती. यावेळी उपस्थितांना मतदानाची शपथ देण्यात आली, यावेळी नागरिकांनी देखील मतदान करण्याचा निर्धार केला. कळवा प्रभाग समिती अंतर्गत प्रभाग क्र. २५ मध्ये घोलाई नगर, मार्केट परिसरात स्विप पथकामार्फत पथनाट्य सादरीकरण करून मतदानविषयीं जनजागृती करण्यात आली. सादरीकरणावेळी स्वीप पथकातील सर्व कर्मचारी उपस्थित होते. तसेच ठा. म. पा. शाळेतील मधील शिक्षक, विद्यार्थी यांनी सहभाग घेतला. पथनाट्य सादरीकरण वेळी नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.प्रभाग क्र. २३ मध्ये कळवा नाका परिसरात मतदार राजा जागा हो... लोकशाहीचा धागा हो.., आपले मत आपला अधिकार अशा घोषणा देत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली. तसेच पथनाट्यातून नागरिकांना मतदान करण्याबाबत प्रवृत्त करणारा संदेश देण्यात आला.कळवा प्रभाग समिती अंतर्गत प्रभाग क्र. ०९ मध्ये खारेगाव परिसरात स्विप पथकामार्फत पथनाट्य सादरीकरण करून मतदानविषयीं जनजागृती करणारे संदेश नागरिकांना देण्यात आले. लोकशाहीने दिलेला अधिकार हा आपला हक्क असून तो प्रत्येकाने बजावावा. दिनांक १५ जानेवारी रोजी सकाळी ७.३० ते सायं. ५.३० या वेळेत मतदान होणार असून नागरिकांनी मोठ्या संख्येने मतदान करावे असे आवाहन यावेळी करण्यात आले.